सरळ सेवा प्रवेशाने रिक्त पदे भरण्यावरील
निर्बंध शिथील करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग.
शासन परिपत्रक क्रमांक डीबीबी-१९९०/प्र.क्र.८४/अर्थसंकल्प-१९,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक १८ मे १९९१.

वाचा : [१] सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक: आरटीआर-१९८८/८१९/१२, दिनांक १४ एप्रिल १९८९.

[२] वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक डीबीबी-१९९०/प्र.क्र.२१/अर्थसंकल्प-१९, दिनांक ६ मार्च १९९०.

शुध्दीपत्र :-

उपरोक्त विषयावरील शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक: डीबीबी-१९९०/प्र.क्र.२१/अर्थसंकल्प-१९, दिनांक ६ मार्च १९९० च्या परिच्छेद २ ऐवजी

"तसेच रिक्त पदांवर सेवानिवृत्त चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांच्या मुलास/अविवाहित मुलीस सरळसेवा प्रवेशाने शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्रमांक: आरटीआर-१९८८/८१९/१२, दिनांक १४ एप्रिल १९८९ मध्ये विहीत केलेल्या सर्व अटींच्या अधीन राहून नियुक्ती देण्याबाबतचे प्रत्येक प्रकरण गुणवत्तेनुसार तपासून आणि विहीत कार्यपध्दत अवलंबून त्या प्रकरणी नोकरी देण्याबाबत विचार करण्यात यावा. अशा नेमणुका विभाग प्रमुखांऐवजी संबंधित सक्षम नियुक्ती प्राधिकारी यांना करता येतील." असे वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/-
वि. ह. साखळकर
शासनाचे सह सचिव.

प्रति,
राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्र्यांचे व राज्यमंत्र्यांचे स्वीय सहाय्यक
मंत्रालयीन विभागांचे सर्व सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त.
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख.

....